पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 05/02/2020 (बुधवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर मौजा जयभोले नगर वार्ड क्र. 1 येथे दिनांक 03/02/2020 चे 13:00 वा. ते 13:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. कुसुम वामन मानुसमारे, वय 60 वर्ष, रा. जयभोले नगर, वार्ड क्र. 1, खापरखेडा यांचे घराच्या दाराचा अज्ञात आरोपीने कुलूप तोडून घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने घरातील कपाटामध्ये ठेवलेल चांदीचे दागिने कि. 6,500/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार कटरे 9922420496 हे करीत आहे.

2) पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 15 कि.मी अंतरावर मौजा घोटमुढरी येथे दिनांक 04/02/2020 चे 16:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– लवकुमार श्यामरावजी पटले, वय 56 वर्ष, रा. घोटमुंढरी यांचे घराच्या दाराचा अज्ञात आरोपीने कुलूपाचा हुक तोडून घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने घरात ठेवलेल्या टिनाचे पेठीमध्ये असलेले सोन्या– चांदीचे दागिने कि. 20,250/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

## चोरी

1) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत मौजा घाटपेंढरी शिवार येथे दिनांक 01/02/2020 चे 09:45 वा. दरम्यान वनविभाग वन्य प्राणी गनने करीता दि. 28/01/2019 ला लावलेले 02 ट्रॅप कॅमेरे किमती 13,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्री. प्रदीप वासुदेवराव आरोडे, वय 53 वर्ष, रा. घाटपेंढरी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक मनीराम नेवारे 952760701 हे करीत आहे.

2) पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावर मौजा निमखेडा येथे दिनांक 02/02/2020 चे 17:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरज देवानंद घटोळे, वय 25 वर्ष, रा. मोहाडी ता. मौदा जि. नागपूर हे त्यांच्या साथीदार महाराज सह भागवत सप्ताह कार्यक्रम करीता आपले साहीत्य घेउन गेले होते. त्यामधे पीयानो ऑगर्न कि. 30,000/–रु. व रीयलमी सी. 2 कंपनिचा मोबाईल कि. 5,000/–रु. चा मुद्देमाल अज्ञात चोराने मुक्कामी असलेल्या उघडया रुममधून चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक इंगळे 7666015204 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. कळमेश्वर :– दिनांक 01/12/2018 ते दिनांक 03/02/2020 चे 18.00 वा. दरम्यान 23 वर्षीय फिर्यादी/पीडित हिला आरोपी नामे– लिलाधर तलाल, रा. पारशिवनी याने वारंवार फोन करून ''मला तुझ्या सोबत भेटायचे आहे'' तेव्हा फिर्यादीने मला भेटायचे नाही असे म्हणुन आपले मोबाईल सीम बदलवीले. तरी सुद्धा आरोपीने पीडितेच्या दुसऱ्या नवीन मोबाईल नंबर वर फोन करून तसेच घरी येवुन भेटायचे आहे असा त्रास देत पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354(ड) भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक कर्मलवार 9021452760 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर